# विश्वबंधुत्व

मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनचे द्वैमासिक

फेब्रुवारी – मार्च २०२०

# मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

प्रकाशक
अध्यक्ष
मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन

वर्ष २०२० | फेब्रुवारी – मार्च २०२० | अंक ३

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शीर्षक / लेखक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | संपादकीय<br>बंधु (ॲड.) संजय दि. पोटे | ३ |
| २. | भवाली नैनीताल प्रवास –<br>ले. – सौ. दिप्ती कारखानीस, मिरज. | ५ |
| ३. | इये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी –<br>ले. – प्रा. डॉ. ए. एस. सोनोने, अकोला. | १० |
| ४. | थिऑसॉफिस्टची कर्तव्ये | ९ व १५ |
| ५. | दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ<br>प्रेषक – बंधु नितीन अभ्यंकर, पुणे. | १६ |
| ६. | लॉज वार्ता | २४ |


**या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मतांशी संपादक मंडळ आणि मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन सहमत असेलच असे नाही.**

**वार्षिक वर्गणी : रु. १००/–**

**(आजीव सदस्य – १५ वर्षे – रु. १०००/–)**

# संपादकीय

विश्वबंधुत्व मासिकाचा (द्वै-मासिकाचा) मुख्य उद्देश **'प्रबोधन'** हा आहे हे आपणा सर्वांना माहित आहे. त्यामुळे ह्या आपल्या मासिकातील लेख त्या दृष्टिकोनातून प्रकाशित केले जातात. विश्वबंधुत्वाच्या संपादनाची जबाबदारी असलेले सर्वजण आपापले काम चोखपणे पार पाडत आहेत. अगदी अल्पावधीतच विश्वबंधुत्वातील माहितीचे वाचकांनी कौतुक केले ही बाब संपादक मंडळाला उत्साहवर्धक वाटते. काही वाचकांनी सुचविलेल्या सुचना प्रत्यक्ष अंमलात आणण्यात येतील आणि निश्चितच ह्या मासिकासाठी अधिकाधिक चांगले काम करण्याचा संपादक मंडळ प्रयत्न करेल. विश्वबंधुत्वाच्या वर्गणीदारांची यादी अद्ययावत करत आहोत. विशेषतः वर्गणीदार बंधू व भगिनींचे योग्य पत्ते व पिनकोड नंबर तसेच संपर्क नंबर घेत आहोत आणि ह्याच अनुषंगाने मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन मधील सर्व सभासदांची (जुने व नवीन) सर्वसमावेशक यादी तयार होत आहे.

जानेवारी व फेब्रुवारी मध्ये म. थि. फे. तर्फे दोन प्रमुख उपक्रम घेण्यात आले. पूना लॉजमध्ये खुले चर्चासत्र आणि बेळगाव येथे इंटर-फेडरेशन सेमिनार ह्या दोनही उपक्रमांचा सविस्तर वृत्तांत ह्या मासिकामध्ये दिला आहे. बेळगाव लॉजने आयोजित केलेल्या उपक्रमात कन्नड व मराठी भाषिकांनी एकत्रपणे संपूर्ण उपक्रम राबवला. वास्तविक महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद हा बेळगाव परिसरातील एक गंभीर प्रश्न आहे हे सर्वश्रुत आहे. अशा परिस्थितीमध्ये वैश्विक बंधुत्वाचे एक उदात्त व अनुकरणीय स्वरूप ह्या सेमिनारमध्ये बघावयास मिळाले. मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनने घेतलेल्या ह्या पुढाकाराची इंडियन सेक्शनने व आंतरराष्ट्रीय अध्यक्षांच्या कार्यालयाने स्तुती केली आहे. वर नमूद केल्याप्रमाणे कोणतेही कौतुक सभासदांसाठी उत्साहवर्धक असतेच.

म. थि. फे. अंतर्गत कार्यरत सर्व लॉजेस्च्या पदाधिकाऱ्यांची (अध्यक्ष व सचिव यांची) एकत्रित सभा दोन भागांमधे घेण्यात येणार आहे. श्रीकृष्ण लॉज अमरावती व पूना लॉज येथे होणाऱ्या सभांमधे थिऑसॉफीच्या सभासदांसाठी विविध उपयुक्त बाबी कार्यान्वित करण्याचे नियोजन आहे.

महात्म्यांचे बोल आहेत - **''तुमच्याभोवती, थिऑसॉफिकल सोसायटीत आणि तिच्याबाहेरही तुमच्या ओळखीची आणि स्नेहसोबती मंडळी आहेत;**

**त्याचप्रमाणे सहकारी आहेत. त्यांना प्रकाशाकडे वळवा. त्यांना अध्यात्ममार्गावर न्या. प्रिती व औदार्याचे प्रचारक बना. अशा प्रकारे इतरांना सहाय्य करीत करीत स्वतःचे परमकल्याण साधा.**''

आपला बंधु
संजय दि. पोटे (ॲड.)
अध्यक्ष, म.थि.फे., पुणे.

---

## कर्मफल चिंतन
## कर्म स्वातंत्र्य की कर्मबद्धता

आपण रोजच्या जीवनात कायमच पहातो की माणूस जेव्हा कोणताही छोटा मोठा निर्णय घेतो, छोटी मोठी कृती करतो, तेव्हा त्याला तत्वतः आणि प्रत्यक्ष जरी पूर्ण कर्मस्वातंत्र्य असले तरी बहुतांश वेळा तो एक ठराविकच निर्णय घेतो, त्याशिवाय तो दुसरी कृती किंवा निर्णय घेऊच शकत नाही. तो कोणता निर्णय घेणार हे त्याच्या आत्तापर्यतच्या अनेक जन्मांमध्ये केलेल्या कृतींचा परिपाक असतो, त्याच्या संस्कारांची परिणिती असते. या ठराविक, चाकोरीबद्ध निर्णयापेक्षा वेगळा निर्णय, वेगळी कृती करण्याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य, मुभा असते. पण तो तसे करत नाही. अगदी हाताच्या बोटावर मोजता येईल एवढेच लोक अशा ठराविक चाकोरीच्या, जवळ जवळ आधीच निश्चित असलेल्या कृतीपेक्षा वेगळी कृती करतात. तीच तीच कारणांची पुनरावृत्ती न करता नवीन कारणे निर्माण करतात.

यामुळे होते काय की वर वर पहाता माणूस कर्म करायला बद्ध आहे, मुक्त नाही असे भासते. त्यामुळे ''**माणूस कर्म करायला स्वतंत्र आहे का बद्ध आहे? त्याच्या हातात काहीच नसते का?**'' असा प्रश्न वारंवार विचारला जातो. याचे उत्तर अगदी स्पष्ट आहे आणि खोल विचार केल्यावर, चिंतन केल्यावर ते उत्तर आपणास पटते. उत्तर असे आहे की वरवर फक्त बाह्यरंगाने पहाता माणूस कर्मबद्ध आहे असे वाटणे अगदी स्वाभाविकच आहे पण अंतरंगातून तपास केला तर ही बद्धता फक्त आभासी आहे. प्रत्यक्षात प्रत्येक क्षणाला माणूस कर्म करायला, निर्णय घ्यायला, कारण निर्माण करायला स्वतंत्र, मुक्त आहे हे नक्कीच लक्षात येते.

# भवाली नैनीताल प्रवास

**लेखक – सौ. दिप्ती कारखानीस, मिरज.**

भवाली येथे थिऑसॉफीकल (ब्रम्हविद्या) सोसायटीचे केंद्र असून यामधे फक्त उन्हाळ्याच्या दिवसात अभ्यासवर्ग घेतले जातात. तेथे जाऊन आलेल्या सदस्यांकडून या जागेबद्दल आणि अभ्यासवर्गाबद्दल ऐकले होते. या कारणाने तेथे जाण्याची इच्छा होती. यंदाच्या वर्षी जायचे निश्चित केले. सांगली, मिरज येथून आम्ही थिऑसॉफिकल सोसायटीचे सात सदस्य 'कोल्हापूर-निजामउद्दीन एक्सप्रेस' या ट्रेनने मंगळवारी ७ मे २०१९ रोजी रवाना झालो. पुढे जुन्या दिल्ली स्थानकावरून 'राणीखेत एक्सप्रेस'ने गेलो. दिल्ली स्थानकात अमरावतीचे श्री. वानखेडे पती-पत्नी भेटले आणि त्यांच्यासह आम्ही पुढील प्रवासाला लागलो. आमची ट्रेन अगदी वेळेवर पहाटे ४.३० वाजता 'हल्द्वानी' स्थानकावर पोहोचली. स्थानकावरचे पहाटेचे वातावरण हे आपल्याकडील सकाळी सहा वाजता असते तसे होते. आम्ही नऊ जणांनी गरमागरम कॉफीचा आस्वाद घेतला. मी वानखेडे काकू आणि सौ. पाटील वहिनींनी त्या शांत, स्वच्छ, सुंदर स्थानकावरच सकाळच्या फिरण्याचा आनंद घेतघेत सूर्यनारायणाचे स्वागत केले. आपल्या येथील तुलनेत तेथे ते लवकर उगवतात. तो सर्व देखावा पाहून पहाटेपासूनच मन अतिशय प्रसन्न, आनंदी झाले आणि आमच्या दोन दिवसाच्या प्रवासाने आलेला थकवा कोठल्याकोठे नाहीसा झाला. आम्ही खूप उत्साही झालो होतो. सकाळी सात वाजता असणाऱ्या 'कुमाऊँ'च्या खाजगी बस वाहतूक कंपनीच्या हल्द्वानी ते भीमतालमार्गे भवाली बसने आमचा पुढील प्रवास सुरू झाला. मार्ग वळणावळणाचा आणि वरवर चढत जाणारा हिरव्यागर्द झाडींनी अच्छादलेला होता.

भवाली येथे केंद्राच्या दारासमेरच आमची बस थांबली. तेथे केंद्राचे व्यवस्थापन पाहणारे, भारतीय विभागाचे, वाराणसीहून आलेले कोषाध्यक्ष श्री. नारायणन आमचीच वाट पहात दारातच आमच्या स्वागताला अगदी आप्तांप्रमाणे उभे होते. आमची चौकशी करून, आमच्या खोल्या दाखवून, तयार होऊन न्याहरीला येण्याकरता सांगून त्यांच्या पुढच्या तयारीकरता गेले. आम्हीही सर्वजण आपल्या खोल्यांमध्ये गेलो. खोल्या अगदी स्वच्छ होत्या.

टेबल, खुर्ची, पलंग, त्यावर स्वच्छ पलंगपोस घातलेली गादी. पांघरायला गरम अच्छादन, कपड्यांसाठी कपाट, सर्व आवश्यक सुविधांनी सजवलेले स्वच्छ स्नानगृह अशा सर्व सुखसोयी होत्या. आम्ही आंघोळी आटोपून न्याहारी करिता भोजनकक्षामध्ये पोहोचलो. तेथे गरमागरम न्याहरी आणि चहासह श्री. नारायणन आमच्यासाठी सज्ज होते. ९/५/२०१९ ते १६/५/२०१९ पर्यंत आम्हा सर्वांकरिता त्यांनी खूप मेहनत घेतली. कसलीही त्रुटी भासू दिली नाही. अभ्यासवर्गाला आलेल्या सर्वांना कोणत्याही प्रकारची असुविधा भासू दिली नाही. न्याहारी आणि चहाकॉफीचा आस्वाद घेत असतानाच सर्वांनी नैनितालला जाण्याचे निश्चित केले. गाडी ठरवून लगेचच नैनितालला रवाना झालो. येथील निसर्ग अचानकपणे बदलतो. डोंगरी मार्ग असून, डोंगरउतारावर भूस्खलनामुळे मार्ग बंद होण्याचा धोका असतो. आम्हाला त्रास होऊ नये या कारणाने श्री. नारायणन यांनी सायंकाळी लवकर परतण्यास सांगितले.

नैनितालबद्दल खूप ऐकले होते. अनेक सिनेमांमधून ज्याचे दर्शन होते तो नैनिताल पाहण्याची, अनुभवण्याची खूप उत्सुकता होती. सर्व प्रवास सकाळच्या प्रमाणेच वळणावळणाचा, दुतर्फा हिरव्यागार झाडीतून जाणारा होता. नैनिताल येथे आम्ही प्रथम 'टायगर केव्ह' नावाच्या वाघाच्या गुहेत गेलो. तेथे वाघ नव्हता परंतु अरूंद गुहेतून चढउतार करणे हा एक वेगळा अनुभव होता. पुढे 'रोप वे' मधून नैनितालचे आणि घनदाट झाडीमध्ये वसलेल्या नैनितालचा देखावा पाहण्यासाठी दोन डोळे अपुरे असल्याचे वाटत होते. तलाव उंचावरून पाहताना त्याचा आकार डोळ्यासारखा असल्याचे दिसत होते; त्यामुळेच या ठिकाणाला 'नैनिताल' हे नाव दिले असावे. आजूबाजूचा परिसर अद्भुत अनुभव देत होता. तेथून परत खाली आल्यावर भुकेने आपली जाणीव करून दिली. सर्वांनी दुपारचे जेवण आटोपले आणि आम्ही नैनी तलावावर आलो. आम्ही उभयतांनी मनापासून तलावामध्ये नौकानयनाचा अविस्मरणीय आनंद घेतला. नैनितालच्या हवेतील गारव्यात चालण्याचे कष्ट जाणवले नव्हते. आता तलावातील थंड हवेने आम्हाला खूपच ताजेतवाने केले. नौकेची सैर आटोपून तलावाच्या किनाऱ्यावर असलेल्या 'नैनिदेवी'चे दर्शन घेतले. मंदिर परिसर एकदम स्वच्छ, शांत आणि मनाला अतिशय प्रसन्नता देणारा होता. आम्हाला गाडीचालकाने इतरही स्थळे प्रवासात जाताजाता दाखवली आणि भवालीकडे परतीचा प्रवास सुरू झाला. गाडीमध्ये जुनी सुरेल आणि अविट गाणी चालकाने

लावलेली होती. सर्वजण थकलेले होतेच त्यामुळे विमाने हवेत जायला वेळ लागला नाही. भवाली गावी गाडी आल्यावर, वाहनचालकाने विशिष्ठ स्थानिक ठिकाणे दाखवून भवालीबद्दल माहिती सांगितली.

भवाली हे आपल्या सातारा शहराप्रमाणेच डोंगर उतारावर हिमालयातील पर्वतरांगांमध्ये, नयनरम्य निसर्गात वसलेले आहे. हे कुमाऊँ मंडल, नैनिताल जिल्ह्यामध्ये, समुद्रसपाटीपासून ५४२७ फूट उंचीवर आहे. येथील हवामान वर्षभर सुखदायक असते. थंड हवामानामुळे उबदार कपडे घालणे आवश्यक असते. अचानक वातावरणात बदल होऊन पाऊस पडतो; यास्तव छत्री बरोबर ठेवणे आवश्यक आहे. भवाली हौशी प्रवाशांशिवाय इतरांनी फारशी माहीत नाही. हे अतिशय शांत ठिकाण असून शांत आणि एकांतप्रिय लोकांच्या प्रथम पसंतीचे ठिकाण आहे. या क्षेत्रात अनेक ठिकाणी वेगवेगळ्या आध्यात्मिक संस्थांची ध्यानकेंद्रे असल्याचे दिसून येते. जसे मिरजमधील 'वानलेस चेस्ट हॉस्पिटल' येथील वातावरणामुळे टी.बी.च्या रोग्यांना बरे करण्यास सहाय्यक असल्याने सुरू केले गेले तसेच सन १९१२ साली 'चीड'च्या जंगलात मध्यभागी मोठे केंद्र टी.बी. च्या रोग्यांकरिता बांधून तयार केलेले आहे. जवळच शामखेत चहाच्या बागा आहेत. आपल्याकडे कोकणात, वळणदार डोंगर उतारावर भातशेती असते तशीच येथील शेती आहे. येथील झाडीमध्ये अनेक प्रकारची वनौषधी झाडे असून त्यांची शेती केली जाते. जैवफळे आणि भाज्यांचा मोठा बाजार येथे भरत असतो. येथून जवळच 'हिमालयीन जैवतंत्रज्ञान उद्यान' असून विज्ञान शाखेतील विद्यार्थी या ठिकाणी येत असतात. 'बटरफ्लाय संशोधन केंद्र' देखील जवळच आहे.

थिऑसॉफिकल सोसायटीचे अभ्यास केंद्र हिमालयाच्या पर्वतरांगांमध्ये नयनरम्य निसर्गात डोंगरउतारावर भवाली येथे आहे. येथील शांतता आणि प्रसन्नता याच्या परिसरात प्रवेश केल्याबरोबर स्पष्टपणे जाणवते. या केंद्रात आनंद स्वामी यांनी १२ वर्षे राहून साधना केल्याने पावन झालेले आहे. येथील उर्जा सर्वच साधकांना साधना करण्यासाठी खूप चालना देत असून अध्यात्मिक प्रगती अतिशय वेगाने घडून येण्याकरिता उपयुक्त आहे. येथील नैसर्गिक पोषक वातावरण आणि तपस्वी आनंदस्वामींच्या वास्तव्याने पुनित झालेल्या केंद्रात आम्ही पूर्वी काही पुण्यकर्म केलेले असावे म्हणूनच अशा ठिकाणी आम्हाला ९ मे ते १६ मे पर्यंत राहण्याचा योग आला.

थिऑसॉफीमध्ये 'At the Feet of the Master', 'The Voice of the Silece' आणि 'Light on the Path' ही तीन अध्यात्मिक दृष्टीने अतिशय महत्त्वाची पुस्तके आहे. त्यापैकी 'Light on the Path' हे पुस्तक अभ्यासवर्गाचे मार्गदर्शक प्रा. श्री. सी. ए. शिंदे यांनी अभ्यासाकरीता घेतले होते. हे पुस्तक मूलतः संस्कृत भाषेत ताडपत्रावरील हस्तलिखित आहे. एका पानावर तीन ओळी असून, प्रत्येक ओळ ही आपल्यापुरती पूर्ण सूत्र आहे. ही सूत्रे दहा पानांवर लिहिलेली आहेत परंतु कोणी आणि कधी लिहिली याबद्दल कोणताही तपशील उपलब्ध नाही. ही सूत्रे 'महात्मा व्हेनिशिअन' ह्यांनी ग्रीक भाषेत भाषांतरीत केली आणि त्यासोबतच स्वतः या सूत्रांवर अत्यंत मौल्यवान स्पष्टीकरण लिहिले आहे. सिद्धपुरूष हिलॅरिअन यांनी ग्रीक भाषांतराचे इंग्लिश भाषेत रूपांतर केले आणि सन १८८५ मध्ये त्यांची अनुग्रहीत शिष्या थिऑसॉफिस्ट श्रीमती मॅबेल कॉलिन्स यांच्या माध्यमातून हे ज्ञान स्थूल जगतात प्रकट केलेले आहे. असे हे अति महत्त्वाचे गूढ, गंभीर पुस्तक शिंदे सरांच्या मार्गदर्शनाच्या हातोटीमुळे समजण्यास बहुमोल मदत झाली.

रविवारी १२/५/२०१९ रोजी अभ्यासवर्गाकरता आलेल्या सर्व २४ सदस्यांची छोटी सहल भवालीहून उंच असलेल्या 'अल्मोडा' येथे काढली होती. 'अल्मोडा' हे कुमाऊँ उत्तराखंड राज्यातील जिल्ह्याचे ठिकाण आहे. प्रवासादरम्यान कैचीदेवी मंदिरात देवी, राधाकृष्ण, हनुमान आणि कालीमातेचे दर्शन घेतले. घोडाखाल येथे गोरखा लोकांचे श्रद्धास्थान असलेल्या प्रसिद्ध गोलुदेवतेच्या मंदिरात गेलो. ही देवता नवसाला पावते अशी ख्याती आहे. या मंदिरात नवसपूर्ती झाल्यावर लोक देवाला घंटा बांधत असतात. कित्येक हजारोंच्या संख्येने या मंदिराच्या परिसरात सर्वत्र लहानमोठ्या घंटाच घंटा बांधलेल्या आहेत. स्वामी विवेकानंद परिव्राजक म्हणून हिमालयात फिरत असताना 'कोशी' आणि 'सुयाल' या दोन नद्यांच्या संगमावर काकडीघाट येथील मुक्कामात पिंपळाच्या झाडाखाली ध्यानाला बसलेले असताना, त्यांना पिंड-ब्रह्मांडाच्या एकत्त्वाची अनुभूती झाली. त्या स्थानावर काही वेळ थांबून पुढे गेलो. येथे जागेश्वर तीर्थस्थान नावाने 'केदारनाथ' मंदिराच्या शैलीतील अतिप्राचीन १२५ मंदिरांचा समूह आहे. हा वास्तूकलेतील उत्तम नमूना आहे. या ठिकाणी 'नागेशंदारुकावने' असा बारा ज्योतिर्लिंगामध्ये उल्लेखलेले आठवे मंदिर आहे. नागेश्वर मंदिरासोबतच महामृत्यूंजय, कालेश्वर, दुर्गा, सूर्य,

हनुमान, कालिका ही प्रमुख मंदिरे आहेत. ही मंदिरे पांडवांनी बांधली आहेत असे स्थानिक लोक सांगतात. या परिसरात खूप मोठीमोठी देवदार वृक्षांची जुनी झाडे आहेत. एका अतिप्रचंड खोड असलेल्या वृक्षाच्या कट्ट्यावर बसून बहुतेकांनी फोटो काढून, अविस्मरणीय क्षण आणि तो परिसर आपल्या मोबाईलमध्ये टिपून घेतले. दर्शन आटोपून भवाली केंद्रातून सोबत आणलेली शिदोरी सर्वांनी खाल्ली. आम्ही शिदोरी खात असतानाच बाहेर खूप मोठा पाऊस झाला. या ठिकाणाहून पुढे १० कि.मी. वरील उत्तर वृंदावनी येथे असणाऱ्या 'कृष्ण प्रेम आश्रम' पहायला आम्ही जाणार होतो परंतु वाहनचालकांनी पुढचा रस्ता कच्चा आणि अरूंद व मोठ्या चढणीचा असून पाऊस झाल्यामुळे गाडी वर घेऊन जाणे जोखमीचे आहे. धोका पत्करायला नको असे सुचविल्याने भवालीला परतलो.

नंतर १३ मे ते १६ मे अभ्यावर्ग पूर्ण झाल्यावर १६ मे या दिवशी परतीच्या प्रवासाकरता ३५ कि.मी. अंतरावर असणाऱ्या काठगोदाम रेल्वेस्टेशनवर आलो. स्टेशनवरील रेल्वे इंजिनाचा आवाज शांत परिसरात राहून आलो असल्याने खूप कर्कश्य जाणवत होता. आपण आकाशातून पुन्हा धरतीवर आल्याचे जाणवले. दिनांक १७/५/२०१९ ला गुरगाव येथे रहात असलेल्या आमच्या पुतण्याला भेटून १८/५/२०१९ रोजी गाडी क्र. १२६३० 'निजामुद्दीन-यशवंतपूर संपर्कक्रांति'ने अविस्मरणीय स्वर्गीय आनंद घेऊन घरी आलो.

★★★

---

## थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. कर्तव्य बजावण्यास तू इतका का घाबरतोस? मैत्री, व्यक्तीच्या भावना आणि कृतज्ञता या गोष्टी, हे विचार उदात्त आहेत यात शंका नाही. पण कर्तव्यपूर्तीच, तुला ज्याची तीव्र इच्छा आहे त्या आत्मविकासाकडे नेईल.

– कुथूमी

1. Why must you be so faint-hearted in the performance of your duty? Friendship, personal feelings, gratitude are no doubt noble feelings, but duty alone leads to the development you so crave for.

- K. H.

# इये मराठीचिये नगरी, ब्रह्मविद्येचा सुकाळू करी

**लेखक – प्रा. डॉ. ए. एस. सोनोने, अकोला.**

आपल्या पृथ्वीतलावरील सर्व जीवांची उत्क्रांती चालू आहे. त्याची सूत्रे काही ऋषितुल्य महात्म्यांच्या हाती आहे असे थिऑसॉफी सांगते. (God has plan and that plan is Evolution) प्रत्येक जीव हा त्या योजनेचा भाग आहे. अशा ऋषितुल्य, जीवनमुक्त महात्म्यांचा समुदाय असून त्यालाच 'सिद्धसंघ' म्हटले आहे. थिऑसॉफीकल सोसायटीची स्थापना सिद्धसंघातील 'महात्मा कुथुमी' व 'महात्मा मौर्य' यांनी केली ज्यांची संस्कृत नावे 'देवापि' व 'मरु' अशी आहेत. महाराष्ट्रातील सर्व संतांनी सिद्धसंघाचे वर्णन आपल्या अभंगात केले असल्याचे दिसून येते. संत ज्ञानेश्वरांनी त्यांना 'ईश्वरनिष्ठांची मांदियाळी' या नावाने संबोधन केले आहे. सिद्धसंघातील ऋषिंच्या आदेशावरूनच हे कार्य आम्ही करीत असल्याचे संत तुकाराम सांगतात.

आम्ही वैकुंठवासी आलो याच कारणासी ।
बोलले जे ऋषि साच भावे वर्ताया ।
झाडू संताचे मार्ग आड रानी भरले जग ।
उचिस्थाचा भाग शेष उरला तो सेऊ ।
भय नाही जन्म घेता मोक्ष सुखा हाणू लाथा ।।

– संत तुकाराम

वास्तविक आम्ही वैकुंठात वास करणारे आहोत (मुक्त आहोत) परंतु महान ऋषिंनी जे प्रतिपादन केले आहे त्याचे पालन करण्यासाठी आम्ही मृत्यूलोकात आलो आहोत. त्यांनी जो मार्ग दाखविला आहे तो स्वच्छ करण्याचे कार्य आम्ही करू. (संतांनी दाखविलेला मार्ग अजून स्पष्ट करून सांगू) विषय लोभामुळे पारमार्थिक साधने बुडवून टाकली जात आहेत. ज्ञान केवळ शब्दात आहे. आचरणात मात्र शून्य आहे.

तुम्ही सनकादिक संत । म्हणविता कृपावंत ।
एवढा करा उपकार । सांगा देवा नमस्कार ।।
माझी भाकावी करूणा । विनवा पंढरीचा राणा ।।
तुका म्हणे मज आठवा । मूळ लवकरी पाठवा ।।

– संत तुकाराम

वरील अभंगात संत तुकारामांनी सरळ सनकादिक मुनींचा उल्लेख केला आहे. या अभंगावरून हेही लक्षात येते की ते विश्वात्मक परमेश्वराला अत्यंत जवळचे, हृदयस्थ आहेत. ते सनकादिक संतांना विनंती करतात की तुम्ही माझा देवाला नमस्कार सांगा. मजविषयी वैकुंठनाथाजवळ काकुळती करून विनंती करा आणि सांगा की माझी आठवण करून मला बोलावणे पाठवा.

आळंदी हे गाव पुण्यभूमी ठाव । दैवताचे नाव सिद्धेश्वर ।।
चौरंशी सिद्धांचा सिद्ध भेटी मेळा । तो सुख सोहळा काय वानू ।।
नामा म्हणे देवा चला तया ठाया । विश्रांती घ्यावया कल्पवरी ।।

– संत नामदेव

आळंदीला भगवान शंकराचे सिद्धपीठ आहे. त्या ठिकाणी चौरंशी सिद्ध ऋषि एकत्र येतात. त्यांचा मोठा मेळावा भरतो. त्या मेळाव्याचे वर्णन मी काय करू तो अप्रतिम सोहळा असतो.

जे भगवद्गीता म्हणिजे जे ब्रामेशानी प्रशंसिजे ।
सनकादिकी सेविजे आदरेसी ।।
दैवी लक्ष्मी एवढी जवळीक । तेही न देखे या प्रेमाचे सुख ।।
सनकादिकांच्या आशा वाढिनल्या बहुवसा ।
त्याही येणे माने यश येती चिन्त ।।

– ज्ञानेश्वरी

या संवादाला भगवद्गीता म्हणतात याची ब्रह्मादिकांनी प्रशंसा केली आहे. सनकादिक विरक्त पुरूषदेखील अत्यंत पुज्यभावाने तिचे सेवन करतात. देवी लक्ष्मी एवढी जवळीक कोणाची नाही. तिलाही प्रेमसुख मिळाले नाही. सनकादिक मुनी श्रीकृष्णाचे प्रेमसुख मिळावे म्हणून अनंत काळापासून आशा करीत आहेत.

पाहेपा जानिवेळेनी बळे । कोणी वेदापासूनी असे आगळे ।।
कि शेषाहुनी तोंडाळ बोलणे आधी । तोही अंथरूणा तळवटी दडे ।।
येरू नेती नेती म्हणती पुढे । येथे सनकादिक वेडे प्पिसे जाहले ।।

– संत ज्ञानेश्वर

अर्जुना विचार कर ज्ञानसंपन्नतेच्या बाबतीत वेदापेक्षा कोणी मोठा आहे काय? शेषापेक्षा अधिक तोंडांनी बोलणारा इतर कोणी आहे काय? तो देखील माझे अंथरूण झाला आहे. वेद नेति नेति म्हणतात. असे काय सांगू, माझ्या

आत्मस्वरूपाच्या ठिकाणी सनकादिक ऋषि वेडेपिसे झाले आहेत. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र सनतकुमार आहेत (सनक, सनंदन, सनकादिक)

**सिद्धसंघाचे शिष्यत्व (when disciple is ready Masters are ready)**

याच अर्थाचा संत तुकारामांचा अभंग असल्याचे दिसून येते. आपल्याला गुरू शोधावा लागत नाही. अंगी शिष्यत्वाची पूर्णता बनल्यानंतर स्वतः सद्‌गुरू तुम्हाला भेट देतात.

अर्थ काम चाड नाही चित्ता । मानापमान मोह माया मिथ्या ।
वर्ते समाधानी जाणोनी नेणता । साधू भेटी देती तया अवचिता ।
नसता काही संचित ।।

– संत तुकाराम

सत्य सद्‌गुरूराये कृपा मज केली । परि नाही घडली सेवा काही ।
सापडविले वाटे जाता गंगा स्नाना । मस्तकी तो जाणा ठेविला कर ।
बाबाजी आपुले सांगितले नाव ।

**स्वप्न अवस्थेत गुरूदीक्षा (जागृती, स्वप्नी, सुषुप्ती, तुरिया, उन्मनी)**

परमहंस योगानंद यांनी त्यांच्या 'An Autobiogra[hy of a Yogi' या पुस्तकात बाबाजी यांचा उल्लेख केला आहे. ते लिहितात त्यांचे गुरू मुक्तेश्वर, त्यांचे गुरू लहरी महाराज त्यांचे गुरू बाबाजी योगी असल्याचे सांगतात. बाबाजी हे महायोगी असून फार वर्षांपासून हयात आहेत. ते वयाने आजही तरूण दिसतात. ते अनपेक्षित ठिकाणी दिसत व गुप्त होत. बद्रीनारायण जवळ हिमालयात बाबाजी सिद्धसंघातील महात्मा असावेत असे यावरून दिसून येते. गुरू त्यांना शोधत आले.

**ज्ञानेश्वरी आणि निरवाची वाणी (Voice of the Silence)**

Yet its maxims and ideas, howerer noble and original, are often found under different forms in Sanskrit works, such as the Jnanesvari, that superb mystic treatise in which Krishna describes to Arjuna

**Hall of Ignorance (Avidya) – (मी म्हणजे देह व विषयभोग हे सत्य नाही)**

तै अज्ञान जै सुमुळ मिटे । तै भ्रांतीचे मसेरे फिटे ।।
मग अकर्तुत्व प्रगटे । मज ईश्वराचे ।।

– ज्ञानेश्वरी

ते अज्ञान ज्यावेळेला संपूर्णपणे नाहीसे होते त्या वेळेला भ्रांतीरूप काजळी दूर होते. मग ईश्वराचे कर्तुत्व प्रचितीला येते.

मी अज्ञानी व असमर्थ असल्याचे संत तुकाराम पुढील अभंगात सांगतात

पांगुळ झालो देवा नाही हात न पाय ।
बैसलो जयावरी सैराट ते जाय ।।
खेटीला कुंपकाठी खुंट दरडी न पाहे ।
आधार नाही कोणी मज बाप ना माय ।।
दाते हो दान करा जाते पंढरपुरा ।
न्या मज तेथवरी अखामाचा सोयरा ।।
हिडता गावाने ग शिणले येरझारी ।
न मिळेची दाता कोणी जन्म न दुख निवारी ।।
दुरोनी आलो मी गा दुख झाले दारूण ।
यावया येथवरी होते हेची कारण ।।
दुर्लभ भेटी तुम्हा पायी झाले दर्शन ।
विनवितो तुका संत दोन्ही कर जोडून ।।

**Hall of Learning *** In it thy Soul will find the blossoms of life, but under every flower a serpent coiled.

अभिमान गेला तुका म्हणे देव झाला

शारदिये चे चंद्रकळे । माजी अमृत कण वेगळे ।
तिये सेविती चकोर तलगे ।।
ऐसे हळूवारपण येईल । तरीच हे उपेगा जाईल ।।
येरवी गोठी होईल । मुक्या बहिराची ।।
हे शब्देविण संवादिजे । इंद्रिया नेणता भोगिजे ।।

**Hall of Wisdom -**

तेणे कारणे मी बोलेन । बोली अरूपाचे रूप दाविन ।।
अतिंद्रिय परि भोगवीन । इंद्रियाकरवी ।।

जे इंद्रियातीत आहे ते इंद्रियागम्य होईल असे ज्ञानेश्वर म्हणतात.

**अनाहत नाद –**

असो ती कुंडलिनी बाळी । हृदया आत आली ।।
तव अनाहताची बोली । चाळवेते ।।

**At the Feet of the Master**

**विवेक (Discrimination)** – What is right and what is wrong

आधीच विवेकाची गोठी । वरी प्रतिपादी कृष्ण जगजेठी ।।
फेडूनी अविवेकाची काजळी । विवेक दीप उजळी ।।
तै योगिया पाहे । दिवाळी निरंतर ।।

**वैराग्य (Desirelessness)** – इह परलोकातील विषय सुखाची यत्किंचित इच्छा नसणे याला वैराग्य म्हणतात.

ब्रह्मरस गोडी । तयासी लाभली ।। वासना निमाली । समूळ ज्याची ।
जे वैराग्याची शिव न देखती । जे विवेकाची भाषा नेणती ।
ते मूर्ख केवी पावती । मज ईश्वराते ।।

**सदाचार (Good Conduct)** – अनंत जन्मापासून विषयाकडे धावण्याचा अभ्यास असलेल्या चित्ताला इंद्रियांच्या स्वाधीन होऊन विषयाकडे धावू न देण्याचा सतत प्रयत्न करणे याला सदाचार म्हणतात.

आत्मसुखाचिया गोडीया । विटे जो का सकळ विषया ।।
जयाचे ठायी इंद्रिया । मान नाही ।।

**भक्ति (Love)** – भक्ति नसेल तर भेद आणि अहंकार निर्माण होतो. त्यामुळे साधक पूर्णत्वाला जाऊ शकत नाही.

तयापाशी पांडवा । मी हरपला गिवसावा ।।
जेथ नामघोष । बरवा करती माझा।।
माझे भक्त गाती जेथे । नारदा मी उभा तिथे ।।

भक्ताजवळ मी आहे असे भगवंत सांगतात कारण भक्तीमध्ये समर्पण आहे. अहंकार गेला तुका म्हणे देव झाला.

★★★

---

## महात्म्यांचे बोल

1. Follow the principles, not the personalities.
2. Strive towards the Light, all of you brave warriors for the Truth, but do not let selfishness penetrate into your ranks, for it is (un)selfishness alone that throws open all the doors and windows of the inner Tabernacle and leaves them unshut.

# थिऑसॉफिस्टची कर्तव्ये

१. नित्य कोणते व अनित्य कोणते, सत्य आणि असत्य यामधील भेद तू कसा जाणशील? फक्त आत्मविकासातून. आत्मविकास कसा साधावा? प्रथम आत्मवंचनेच्या कारणांपासून स्वतःचे काळजीपूर्वक रक्षण करुन. तू हे पुढील प्रकारानी करु शकतोस. प्रत्येक दिवशी नेहेमीकरता ठरवलेला तोच एक किंवा एकाहून अधिक तास एकांतात, आत्मपरिक्षणात, लिहिण्यात, वाचनात, स्वतःच्या हेतुंच्या शुद्धिकरणात, अभ्यासात आपले दोष सुधारण्यात व तुझ्या बाह्य जगातील कामाची आखणी करण्यात खर्च कर. हळूहळू तुझी दृष्टि निवळेल. तुझ्या दृष्टिला सर्व गोष्टी स्पष्ट दिसू लागतील. धुके विरू लागल्याचे तुला दिसेल. तुझ्या अंतःशक्ती अधिक बलवत्तर होतील व आमच्याबद्दलचे तुझे आकर्षण अधिक जोर धरेल. शंकांचे समाधान होऊन त्यांची जागा पक्की खात्री घेईल. – कुथूमी

1. How can you know the real from the unreal? the true from the false? Only by self-development. How get that? By first carefully guarding yourself against the causes of self-deception. And this you can do by spending a certain fixed hour or hours each day all alone in self-contemplation, writing, reading, the purification of your motives, the study and correction of your faults, the planning of your work in the external life .... Little by little your sight will clear, and you will find the mists pass away, your interior faculties strengthen, your attraction toward us gain force, and certainly replace doubts.

**- K. H.**

---

**"ईश्वरावर कोणत्याही मानवी गुणदोषांचे आरोपण न करता ईश्वर म्हणजे अपरिवर्तनीय निसर्गनियम आणि नैसर्गिक शक्ती" याचे आकलन होणे म्हणजेच अध्यात्म असे म्हणता येईल.**

# दामोदर आणि थिऑसॉफिकल चळवळ

**प्रेषक – नितीन अभ्यंकर, पूना लॉज.**

**(मी पूना लॉजमध्ये जुलै २०१९ पासून महिन्यातून एकदा या विषयावर बोलत आहे. तेच व्याख्यान येथे क्रमशः देत आहे.)**

**आता यापुढील काही सत्रात आपण दामोदरने विविध व्यक्तींना जी पत्रे लिहिली त्या पत्रांचा धावता आढावा घेऊ या. असे करण्याची दोन मुख्य कारणे – एक म्हणजे त्याकाळच्या थिऑसॉफिकल सोसायटीशी संबंधित विविध घटनांची आपणास माहिती होते आणि दुसरे म्हणजे या लिखाणातून दामोदरने जी शिकवण आपणा सर्वांसाठी नकळतपणे मागे ठेवली आहे ती आपण समजून घेऊ शकतो आणि त्यातून आपले जीवन आणखी आध्यात्मिक बनवू शकतो.**

दामोदर आणि डब्लू. क्यू. जज यांच्यादरम्यान काही काळ पत्रव्यवहार झाला होता. (जज हे सोसायटीच्या स्थापनेपासून निगडीत आहेत. अमेरिकन सेक्शनशी संबंधित अनेक चांगल्या व वाईट घटनांमध्ये यांचा प्रत्यक्ष संबंध आहे. जज आणि सोसायटीतील एच्. एस्. ओ., एच्. पी. बी. व इतर अनेक सदस्य यांच्यात अनेकदा खूप गैरसमज झाले आणि ते बराच काळ टिकून राहिले. विशेषतः महात्म्यांकडून येणारे संदेश, पत्रे, आदेश, सूचना याबाबत वातावरण खूपच गढूळ झाले होते. या सगळ्याचा अमेरिकेतील थिऑसॉफिकल चळवळीवर खूप खोलवर परिणाम झाला.)

ही पत्रे जजने जून १८८६ पासून 'The Path' या नियतकालिकात 'A Hindu Chela's Diary' या शिर्षकाखाली लेखमाला प्रकाशित केली होती. या पत्रांतून जजच्या वर वर्णन केलेल्या वागणूकीसंदर्भात दामोदर जजना बऱ्याच गोष्टी सांगतात, सल्ले देतात, आपले मत स्पष्टपणे मांडतात. मी ज्या पुस्तकातून आपणास माहिती देत आहे त्यात सुमारे ७५ पाने दामोदर आणि जज यांच्यातील पत्रव्यवहार मांडतात. त्यातले काही ठळक मुद्दे अगदी संक्षिप्त स्वरूपात आपण आता पाहू या. या पत्रांतून आपले म्हणणे दामोदर प्रश्नांच्या स्वरूपात मांडतात ज्यावर जज यांनी स्वतः विचारमंथन करावे अशी दामोदर यांची अपेक्षा आहे. (आपणही याचा अभ्यास याच भूमिकेतून करावा असे मला वाटते.)

**५/१०/१८७९ चे पत्र** –१) जी व्यक्ती (म्हणजे जज) खऱ्या ज्ञानप्राप्तीच्या

उंबरठ्यापाशी उभी आहे, इतकी प्रगती ज्याने केली आहे अशा व्यक्तीने एच्.पी.बीं. बद्दल दूषित भावना ठेवाव्यात व गढूळ विचार करावा हे खूपच आश्चर्यकारक आहे. हे सांगताना दामोदर एक उचित व सुंदर उपमा देतात. ते म्हणतात ''तहानलेला माणूस पाण्याच्या शोधात असताना त्याला समोर सुमधुर पाण्याचा मोठा साठा दिसतो पण ते पाणी पिण्याऐवजी त्याकडे पाठ फिरवून तो दुसरीकडे पाण्याचा शोध घेऊ लागतो असे तुमच्याबाबतीत घडत आहे.''

२) दामोदर लिहितात, माझ्या पूर्वजांनी जी शिकवण दिली तिला 'आयसीस' मध्ये एच्.पी.बी. स्पष्ट दुजोरा देतात आणि ही फक्त शिकवण नसून तो माझा प्रत्यक्ष अनुभव आहे असे पण एच्.पी.बी.सांगतात. ही शिकवण आपल्याला हिंदू ग्रंथात अजूनही सापडते पण त्याची गुरूकिल्लीच सध्याचे हिंदू हरवून बसले आहेत आणि ही किल्ली फक्त थिऑसॉफीतच मिळू शकते. या पत्रात 'आयसीस' मध्ये प्रामुख्याने जी शिकवण आहे त्याचा आढावा दामोदर घेतात.

३) माणसामध्ये कोणकोणत्या क्षमता अंगीभूत आहेत आणि त्यांचा वापर कसा करावा याबद्दल दामोदर लिहितात – या क्षमता ज्यांनी पूर्णत्वाला नेल्या आहेत; ज्यांनी स्वतःवर पूर्ण ताबा मिळवला आहे तसेच ज्यांनी निसर्गातील शक्तींवर नियंत्रण मिळवले आहे; निसर्गातील शक्तींचा वापर कसा करायचा हे ज्यांना माहित आहे असे महात्मे प्रत्यक्षात अस्तित्वात आहेत व या महात्म्यांनी अनादिकालापासून पवित्र ग्रंथांचे, ज्ञानाचे जतन व रक्षण केले आहे. पण त्यांनी हे सर्व काही एका रात्रीतून आत्मसात केलेले नाही. जे काही मिळवायचे असते ते क्रमाक्रमाने मिळवावे लागते. त्यात घाई करून चालत नाही. घाईघाईने काही केले तर त्यात खोट रहातेच. प्रत्येक प्रवासात सदैव अथक प्रयत्नांची (perseverence) गरज आहे. 'Try Again' हे नेहमी आपले ब्रिदवाक्य असले पाहिजे. प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक व संयमाने केली पाहिजे. (आपल्या आध्यात्मिक आकांक्षा व आध्यात्मिक प्रवास याला हे जास्त प्रकर्षाने लागू आहे.)

४) आपण जर नीट पाहिले तर आपले पूर्वज जो मार्ग पादाक्रांत करून शिखरावर पोचले त्याच्या स्पष्ट पाऊलखुणा दिसतात, जाणवतात. ही सुवर्णसंधी समोर असताना त्या मार्गदर्शक पाऊलखुणा न ओळखणे आणि त्या मार्गावर आपली पावले न पडणे यापेक्षा मोठा करंटेपणा तो कुठला?

मुख्य मुद्दा असा आहे की या पाऊलखुणा ओळखायच्या कशा आणि कुठे? उत्तर अर्थातच आहे 'हिंदुस्तानात'. ज्यांनी या मार्गदर्शक पाऊलखुणा मागे सोडल्या आहेत ते महात्मे या ऐहिक, गजबजलेल्या सांसारिक जगापासून दूर आहेत. तर मग या पाऊलखुणांपर्यंत आणि त्या मार्गदर्शकांपर्यंत पोचता येते का? हा आणखी एक महत्वाचा प्रश्न. अर्थात पोचता येते पण त्यासाठी काही गोष्टी, पथ्ये आवश्यक आहेत.

१) आपली वैयक्तिक विहित कर्तव्ये प्रत्येकाने चोखपणे पार पाडली पाहिजेतच पण त्याशिवाय माणूस म्हणून आपली जी काही कर्तव्ये आहेत तीदेखील काळजीपूर्वक निभावली पाहिजेत. हे संपूर्ण विश्व आणि त्यातील सर्व काही एकाच दैवी स्त्रोतापासून प्रसुत झाले आहे. म्हणूनच या विश्वातील सगळे एकमेकांशी बंधुत्वाच्या नात्याने जोडले आहेत. आपण संपूर्ण मानवजातीसाठी जे जे चांगले आहे ते ते केले पाहिजे. प्रत्येक व्यक्तीत आत्मा आहे. हा अंतरात्मा मॅटरच्या बंधनातून, जोखडातून मुक्त होऊन परमतत्वात विलीन होणे हे प्रत्येकाचे अंतिम उद्दिष्ट आहे. यासाठी जे आवश्यक आहे ते करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.

२) आपण या जगातले आपले गुंतणे जितके शक्य आहे तितके कमी केले पाहिजे. मानवजातीसाठी जे जे आवश्यक आहे ते करणे ही तुमची सदैव प्रथम इच्छा पाहिजे. (Although you are in the world, your inner man should be out of it.) हे एकदा तुम्ही प्रत्यक्षात आचरणात आणलेत की आपोआप तुमच्यापुढे आध्यात्मिक मार्गावरील नवीन दालने उघडली जातील. महात्म्यांच्या पाऊलखुणांपर्यंत पोचण्याचे इतर मार्ग तुमच्या दृष्टीपथात येतील. या प्रक्रियेमध्ये तुम्ही कोणत्याही परिस्थितीत निराश होता कामा नये. तुम्हाला महात्मे भेटले नाहीत याचाच अर्थ तुम्ही तुमची कर्तव्ये बजावण्यात कमी पडला आहात. तुमची पुरेशी तयारी झालेली नाही. वस्तुस्थिती अशी आहे की महात्मे सदैव अशा जीवात्म्यांच्या शोधात आहेत जे अध्यात्मशास्त्राचा अभ्यास, चिंतन करतात. त्याप्रमाणे आपले आचरण ठेवतात. जे प्रामाणिकपणे आपली कर्तव्ये बजावतात. अतिशय निष्ठेने महात्म्यांपर्यत जाण्याची इच्छा धरतात. तुम्ही योग्य कारण निर्माण करा त्याचा निश्चित परिणाम हा होणारच. तुम्ही कर्तव्यात कुसुर केलीत, काहीतरी निमित्त पुढे करून कर्तव्यापासून पळ काढलात तर तुम्ही योग्य कारण निर्माण करू शकणार नाही म्हणून निराश न होता आत्मविश्वासाने

चालत रहा, तुमचे यश नक्की आहे. इतके सगळे करूनही जर महात्म्यांच्या पाउलखुणांपर्यंत तुम्ही पोहोचू शकला नाहीत तरी तुमचे प्रामाणिक प्रयत्न अजिबात वाया जात नाहीत कारण आता तुमच्यातले आणि अंतिम ध्येयामधले अंतर कमी झाले आहे पण अजून काही प्रवासाची गरज आहे. म्हणूनच जो प्रवास तू सुरू केला आहेस तो अतिशय सावधपणे, संयमाने, निराश न होता चालू ठेव. लवकरच तू देवळाच्या गर्भगृहाच्या पायरीपाशी असशील.

**८/११/१८७९ चे पत्र** – उत्तरादाखल जज जे पत्र लिहीतात त्यात ते त्यांचे जीवन, त्यांची दैनंदिन कार्यव्यस्तता, अमेरिकेतील एकंदर जीवनपद्धती, तेथील लग्नसंस्था इत्यादीचे वर्णन करतात. अध्यात्मिक अभ्यास, चिंतन, मनन यासाठी त्यांना कसा वेळ काढता येत नाही हे सांगतात.

**२४/१/१८८० चे पत्र** याला काहीशा उशिराने दामोदर उत्तर लिहितात. पत्रात ते हा उशीर झाल्याची कारणे सांगतात. एच्.पी.बी. दामोदरला आदेश देतात की त्यावेळच्या बनारसच्या भेटीचा तपशील, सर्व अनुभव जजना कळव. येथे दामोदर यांची विनम्रता (perseverence) दिसते. ते म्हणतात, ''एच्.पी.बी., एच्.एस्.ओ. यांचे निकट सान्निध्य, अनुकुल वातावरण असूनही या संधीचा मी पुरेसा फायदा करून घेण्यात कमी पडलो. सोसायटीत येऊन ६ महिने झाले पण मी अजून अगदी प्राथमिक, तळाचा थिऑसॉफिस्ट आहे. मला सुधारणेच्या संधी असूनही मी त्या पूर्णतः घेतल्या नाहीत. बनारसचे अनुभव लिहिताना ते अध्यात्मिकदृष्ट्या लिहिण्यास मी पात्र नाही असे मला वाटते पण आईने सांगितले आहे म्हणून लिहीत आहे. मी जे पाहिले, अनुभवले ते तुला सांगणार आहे. त्यावर माझे असे काही अधिक भाष्य नसेल. त्यातून जे काही नैतिक सार तुला काढायचे ते तू काढ.''

उर्वरित पत्रात दामोदर हे एच्.पी.बी., एच्.एस्.ओ., ए. पी. सिनेट, त्यांच्या पत्नी मिसेस जॉर्डन यांची बनारस भेट, माँजी, स्वामीजी याबद्दल सविस्तर लिहितात. एच्.पी.बी.नी काहीतरी फेनॉमेना घडवावा असे सिनेट यांना वाटत असते पण असे करायला माँजी व स्वामीजी परवानगी देत नाहीत. एक दिवस एच्.पी.बी. फुलांचा वर्षाव करतात. हा चमत्कार त्या स्वामीजींच्या माध्यमातून घडवतात असे दामोदरला जाणवते. एक दिवस माँजी आणि एच्.पी.बी. यांची दामोदरच्या उपस्थितीत भेट होते. माँजी एच्.पी.बीं.च्या आयुष्यातील घटना सविस्तरपणे सांगतात. त्या सध्या जरी स्त्रीदेहात असल्या

तरी त्या हिंदू फकीर आहेत इत्यादि इत्यादि. माँजीनी एच्.पी.बीं.चे गुरू, त्यांचा भूतकाळ, भविष्य तसेच एच्.पी.बी., एच्.एस्.ओ. यांना कार्ला केव्हस् येथे भेटलेले संन्यासी, त्यांनी दिलेली सांकेतिक खूण याबद्दलही बरेच काही सांगितले. कार्ला केव्हस् येथे एच्.पी.बी., एच्.एस्.ओ. आणि त्यांच्याबरोबर असलेल्या लोकांना ५ पायांची गाय दिसली होती. याचे अध्यात्मिक, योगिक स्पष्टीकरण माँजीनी दिले.

नंतर परत एकदा माँजी भेटायला आल्या. त्यावेळेस स्वामीजी व एच्.पी.बी. सोडून सर्व उपस्थित होते. या भेटीत माँजीनी एच्.पी.बीं.चा पूर्वेतिहास, मागील जन्मांमध्ये त्या कोण होत्या इत्यादि सांगितले. या माँजी युरोपियन लोकांस भेटत नसत परंतु त्यांच्या गुरूंच्या आज्ञेवरून त्या एच्.पी.बीं.ना भेटत. या संभाषणात दामोदरने माँजीना विचारले की खऱ्या एच्.पी.बी. अजून एच्.पी.बीं.च्या सध्याच्या देहात आहेत का? (असे दामोदरने विचारायचे कारण म्हणजे दामोदरना एच्.पी.बीं.ची भेट झाल्यानंतर सारखे वाटत असे की एच्.पी.बी. या दिसतात, वागतात ते त्यांचे खरे स्वरूप नाही. तो फक्त एक मुखवटा आहे. खऱ्या एच्.पी.बी., 'इनर एच्.पी.बी.' कोणीतरी वेगळ्याच आहेत. हे एच्.पी.बीं.पाशी बोलण्याचा त्यांना अनेक वेळा मोह झाला पण प्रत्येक वेळेस त्यांनी तो निकराने टाळला. बनारसच्या या सर्वांच्या वास्तव्यात दामोदरना हे परत एकदा प्रकर्षाने जाणवले.) या प्रश्नाचे उत्तर द्यायला माँजीनी नकार दिला. त्या म्हणाल्या की मी अजून एच्.पी.बीं पेक्षा खूप खालच्या पायरीवर आहे.

येथे दामोदर जजना लिहितात की, तुझ्या आता लक्षात येईल की भारतीय शिकवण, ज्ञान हे बहुतेकवेळा सांकेतिक भाषेत सांगितले जाते. ते या प्राचीन आर्य संकेतांचा, चिन्हांचा अर्थ उलगडू शकतात. त्यांच्यापुढे अथांग ज्ञानाचा महासागर उपलब्ध असतो. माझ्या अध्यात्मिक प्रगतीसाठी मी इकडे तिकडे जाऊन काहीच उपयोग नाही. मला काही मिळणार नाही. मी यासाठी सर्वस्वी एच्.पी.बींवर भरवसा ठेवला पाहिजे. त्यांच्या सानिध्यातच माझ्या पुढील प्रवासाची कवाडे उघडली जातील. माँजीनी मला असाही सल्ला दिला की मी एच्.पी.बीं बरोबर एकदा जुनागड परिसरातील जंगलात जावे. तेथे अनेक महात्मे रहातात. मी जरी त्यांना पाहू किंवा ओळखू शकलो नाही तरी त्यांच्या तेथील वास्तव्यामुळे भारलेले वातावरण मला खूप काही देऊन जाईल. त्या पुढे

म्हणाल्या की भारतातील वातावरण जसजसे दूषित होत आहे तसतसे हे सर्व महात्मे बद्रिनाथ आणि हिमालयाच्या उत्तरेकडे जात आहेत.

यानंतर दामोदरसाठी एच्.पी.बी. काय आहेत हे ते लिहितात. ते म्हणतात, सदस्यत्वासाठी अर्ज केल्यावर २-३ दिवसातच मला एच्.पी.बीं बद्दल जे वाटते ते मी त्यांना सांगितले. मी एच्.पी.बीं मध्ये माझी हितकर्ती, गुरू पहातो. मी त्यांच्यावर आईपेक्षा जास्त प्रेम करतो. मला सारखे वाटते की मी याआधीच एच्.पी.बीं कडून तत्त्वज्ञान शिकलो आहे. मी भूतकाळात त्यांचा सर्वात आज्ञाधारक व विनम्र शिष्य होतो. माझ्या भविष्यातील सर्व आशा आणि एकंदर भवितव्य एच्.पी.बीं भोवतीच केंद्रित आहे. जगातील कोणतीही गोष्ट माझा आईवरचा विश्वास डळमळीत करू शकणार नाही. बनारसच्या या दौऱ्यात याच सर्व गोष्टी ज्यांना इंग्रजी अजिबात येत नाही अशा माँजी व स्वामीजी या दोन व्यक्तींनी जशाच्या तशा मला सांगितल्या. त्यामुळे हा दौरा माझ्यासाठी खूप फलदायी ठरला. ज्या पायावर मला इमारत उभी करायची आहे तो पाया बरोबर आहे हा माझा आत्मविश्वास आणखी बळावला.

यानंतर पत्राच्या शेवटी दामोदर २-३ वेळा एच्.पी.बीं.नी चमत्काराने केलेला फुलांचा वर्षाव, दिव्याचे विझणे व पुन्हा प्रज्वलित होणे इत्यादीचे वर्णन करतात.

**१/३/१८८० चे पत्र –** या पत्राच्या उत्तरादाखलच्या पत्रात जज लिहीतात – माझी पूर्वेकडे येण्याची पहिल्यापासून इच्छा आहे पण माझे विपरित नशीब मला पश्चिमेकडे नेते आहे. मग ते त्यांच्या बालपणापासूनच्या काही घटना सांगतात. ऐहिक जगातील चालून आलेल्या किंवा त्यांनी नाकारलेल्या संधींचे वर्णन करतात. ते त्यांच्या पत्रिकेतील राशी, ठळक ग्रह याबद्दलही लिहितात. मी मागच्या जन्मात पूर्वेकडे होतो आणि या जन्मात पश्चिमेकडे आलो आहे. न्यूयॉर्कमध्ये असताना एच्.पी.बी.नी मला एका तसबिरीकडे बारकाईने पहायला सांगितले होते. त्यात तिबेट किंवा भारतातील एक स्थान होते. ते स्थान कदाचित माझे गतजन्माचे ठिकाण असू शकेल किंवा महात्म्यांचे वसतीस्थान असू शकेल. मला त्यावेळेस एच्.पी.बी.नी काही सांगितले नाही. तू आता विचारून पहा.

जज त्यांच्या त्यावेळच्या मनस्थितीचे – विशेषतः त्यांची अध्यात्मिक प्रगती, त्यांची कर्तव्ये, त्यांच्या मनोविश्वात चाललेली खळबळ, अस्वस्थता

याचे सविस्तर वर्णन करतात. जज हे त्यावेळेस विचारांच्या चक्रव्युहात अडकलेले आहेत हे यावरून स्पष्ट जाणवते. ते असेही लिहितात की जर तुझी महात्म्यांकडून निवड व्हायची असेल तर एच्.पी.बी.ना कोणत्याही परिस्थितीत सोडू नकोस. ती एक विश्वासू मित्र आहे. जंगलात वगैरे जाण्याचा विचार चुकुनही करू नकोस. या जगरहाटीत राहूनच मनाला तपासणे, मनाच्या दौडीला लगाम घालणे, शांतपणे आपल्या ध्येयाकडे वाटचाल करणेच योग्य आहे.

यानंतर भारतात येण्याच्या आधी एच्.पी.बी.नी केलेल्या अनेकविध चमत्कारांचे वर्णन जज करतात. न्यूयॉर्कला असताना महात्मे रात्री यायचे आणि मी व एच्.एस्.ओ. यांच्याशी तासनतास बोलायचे अशाही काही आठवणी जज लिहीतात. जज आणि दामोदर यांची कधीच भेट झालेली नसते. त्यांनी एकमेकांना पाहिलेलेही नसते. या पत्रासोबत जज स्वतःचा एक फोटो पाठवतात आणि दामोदरला विनंती करतात की त्यानेही त्याचा फोटो जजना पाठवावा.

**२६/५/१८८० चे पत्र –** यानंतरचे दामोदरने पाठवलेले पत्र उपलब्ध नाही. त्या पत्राला उत्तर म्हणून जज लिहितात, ''आता तू एकटाच आहेस जो मला भारतातून पत्र पाठवतो. एच्.एस्.ओ. फक्त पोस्टकार्डस् पाठवतात आणि तीही फक्त कामासंबंधीच असतात. एच्.पी.बी. अजिबात पाठवत नाहीत आणि ते अपेक्षितच आहे. तू जे नेपोलियन-१ च्या चित्राबद्दल लिहिले आहेस त्याबद्दल अजून सविस्तर सांग. कारण मला खूप काळापासून वाटत आले आहे की मी तेथे होतो आणि मी नेपोलियनला स्वतः पाहिले आहे.

तू एका महात्म्याला पाहिलेस याचे वर्णन जे तू केले आहेस त्यामुळे मी खूप आनंदी आहे. त्यात तू वर्णन केलेले घर महात्म्यांचेच आहे याबद्दल मला अजिबात संशय नाही. आत्ता तुझ्यापाशी येण्यासाठी मी काहीही करण्यास तयार आहे. तू भारतात महात्म्यांच्या प्रत्यक्ष दृष्टीत आणि निगराणीखाली आहेस. अर्थात ते मला इथेही पाहू व मदत करू शकतात पण ते जणू तुझ्या शेजारीच राहतात.'' जज पुढे लिहितात, तुला तुझ्या आंतरिक प्रवासात संयम बाळगला पाहिजे. तू सावकाश पण खात्रीने प्रगती करत आहेस. रांगण्याच्या आधी चालण्याची आणि चालण्याआधी पळण्याची अपेक्षा तू ठेवता कामा नयेस. उतावीळ होऊ नकोस कारण त्यामुळे संघर्ष निर्माण होतो. आंतरिक शांततेच्या पार्शभूमीवर अगदी थोडा आवाजसुद्धा मोठा वाटतो. उतावीळ व अस्वस्थ झाला नाहीस तर तुझे उमलणे सलग असेल. महात्मे कधीच निष्क्रिय नसतात.

तुझ्या प्रगतीबद्दल संशय घेऊ नकोस. तुझा संशय, उतावीळपणा व भिती मोठा अडथळा आहे. तीव्र इच्छा धर पण अस्वस्थ होऊ नकोस. परिस्थितीला शरण न जाता शांतपणे, निश्चयाने प्रत्येक दिवसाला सामोरा जा.

दामोदर म्हणतात – "shall ever the day come when my thirst will be quenched and I allowed to penetrate into the imost recesses of than montain which I saw from a distance of not more than 150 yards". यावर जज म्हणतात, ''पर्वतावर विश्वास ठेव. त्यावर तुझी इच्छा पक्की कर. स्वतःला योग्य बनव. योग्य वेळ आल्यावर तू पर्वत ओलांडून जाशील. महात्मे नवशिक्या उमेदवाराला उपदेश देतात – "Know, Will, Dare, Keep Silent". याचा प्रयत्न करण्याची आणि अंमलात आणण्याची हीच वेळ आहे. हीच सध्या तुझी गुरूकिल्ली आहे. तुझ्या मेंटल प्रतिमांच्या रूपाने त्यांचे तुझ्यावर प्रत्येक क्षणाला लक्ष आहे. योग्य वेळ कोणती हे त्यांना बरोबर माहीत आहे. तू कितीही उतावीळ झालास तरी योग्य वेळ येईपर्यंत, तुझी पूर्ण तयारी होईपर्यंत ते थांबतील.''

यानंतर जज स्वतःची आणि दामोदरची तुलना करतात. बाह्य परिस्थिती अनुकूल नसतानाही मी माझ्या अंतिम उद्देशाबद्दल आशादायी आहे. ठामपणे त्यावर लक्ष केंद्रित केले आहे. तुला तर माझ्यापेक्षा जास्त अनुकूलता आहे, त्यामुळे घाईच्या फेऱ्यात न अडकता शांतपणे संयम ठेव.

३१ मे १८८१ मध्ये जज दामोदरला जे पत्र लिहितात. त्यात ते मुख्यतः 'लॉ ऑफ कॉम्पेन्शेसन' म्हणजेच कर्मनियमाबद्दल बरेच काही लिहितात. हा नियम सर्व नियमांमध्ये सर्वात प्रभावी व शक्तीमान आहे. मानवाच्या बाबतीत हाच खरा अंतिम नियम आहे. हा नियम कार्यरत असल्यामुळे आपल्याला यश-अपयश येते. हा नियम, त्याची व्याप्ती, शाखा-उपशाखा, कार्यकारणभाव समजून यायला, आकलन व्हायला सर्वात कठीण आहे. हा संपूर्ण समजला तर आपण सगळ्यावर अंमल करू पण ऐहिक जीवनात हे शक्य नाही. या नियमाचा विचार करताना 'माणसाला पुनर्जन्म असतो' हे गृहित धरावे लागते. बालमृत्यू व मूर्ख माणूस यांची उदाहरणे जज सविस्तरपणे मांडतात. ते लिहितात की, मला प्रश्न आहे की आपल्या कृत्यांची जास्तीत जास्त भरपाई याच आयुष्यात कशी करायची? याचे उत्तर तू मला दे किंवा एच्.पी.बी. आणि कंपनीला विचार. त्या तुला काही सांकेतिक उत्तर देऊ शकतील. (क्रमशः)

# लॉज वार्ता

**फेब्रुवारी, मार्च व एप्रिल २०२० मधील काही महत्वाच्या सभा**

१) **म. थि. फे. तर्फे खुले चर्चासत्र** – शनिवार **दि. २९ फेब्रुवारी** २०२० रोजी **दुपारी ३.३० ते ५.३० – पूना लॉज** येथे.

२) **म. थि. फे. ची कार्यकारिणी सभा** – रविवार दि. **१५ मार्च** २०२० रोजी **सकाळी ११.३०** वाजता **पूना लॉज** येथे.

३) **अकोला, आकोट, नंदुरबार, अमरावती, नागपूर (मैत्रेय), नागपूर (धंतोली), खामगाव व जालना लॉजचे अध्यक्ष व सचिव यांची संयुक्त सभा** – शनिवार दि. **११ एप्रिल** २०२० **सकाळी ११ ते दुपारी ४ – श्रीकृष्ण लॉज अमरावती** येथे.

४) **डोंबिवली, पूना, मालेगाव, नाशिक, सांगली, मिरज, इस्लामपूर, तासगाव व बेळगाव लॉजचे अध्यक्ष व सचिव यांची संयुक्त सभा** – शनिवार दि. **२५ एप्रिल** २०२० **सकाळी ११ ते दुपारी ४ – पूना लॉज** येथे.

◆ **म. थि. फे. कार्यकर्ता वृत्तांत –**

१) **म. थि. फे. तर्फे आंतर–फेडरेशन सेमिनार (एक स्तुत्य उपक्रम)** – म. थि. फे अंतर्गत कार्यरत असणाऱ्या थिऑसॉफिकल लॉज, बेळगावी व कर्नाटक फेडरेशन अंतर्गत असणाऱ्या रामतीर्थनगर लॉज व हूक्केरी लॉज यांचे संयुक्त विद्यमाने गोगटे रंगमंदीर, बेळगाव येथे शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२० रोजी सेमिनार आयोजित करण्यात आले होते. मराठी व कन्नड भाषेमधे थिऑसॉफीचा अभ्यास करणारे थिऑसॉफीचे सभासद या सेमिनारद्वारे एकत्र आले. यादिवशी सकाळी ८.३० ला पूना लॉजचे बंधु कौस्तुभ भडभडे, बंधु अरूण पालकृत आणि रामतीर्थनगर लॉजच्या भगिनी नंदा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारत समाज पूजा करण्यात आली. सकाळी १० वाजता सेमिनारला प्रारंभ झाला. बेळगावी लॉजचे बंधु उरणकर यांनी स्वागतपर भाषण व प्रास्ताविक केले. लॉजची युवा सभासद कु. लक्ष्मी हिने शारदास्तवन केले.

२) **म. थि. फे. तर्फे सांगली येथे सेमिनार** – सांगली येथे एक दिवसीय चर्चासत्र/सेमिनार दि. ९/२/२०२० रोजी यशस्वीरित्या पार पडले.

'साधनचतुष्टय' हा सेमिनारचा विषय होता. सकाळी ९ वाजता भारत समाज पूजा घेण्यात आली. बंधु भडभडे व बंधु मिरजकर यांनी पूजेचे महत्त्व विषद केले व पूजा पार पडली. त्यानंतर हिलींग रिच्युअल्स् (व्याधी निवारण विधी) घेण्यात आले. सेमिनारला सकाळी १० वा सुरवात झाली. बंधु माळी यांनी – विवेक, बंधु कारखानीस यांनी – वैराग्य, बंधु चिल्लाळ यांनी – सदाचार, प्रसन्नता, एकाग्रता व श्रद्धा, बंधु मिरजकर यांनी – प्रेम आणि बंधु तेंडूलकर यांनी – मनोनिग्रह व इंद्रियनिग्रह या विषयांवर उपयुक्त विचार मांडले. उपस्थितांच्या प्रश्नांना वक्त्यांनी प्रभावीपणे उत्तरे दिली. म. थि. फे. अध्यक्ष ॲड. संजय पोटे यांनी सेमिनारचा गोषवारा मांडला व क्लिष्ट विषय अभ्यासपूर्ण रितीने मांडल्याबद्दल वक्त्यांचे कौतुक केले. सेमिनारच्या मध्यान्नात सर्वांनी एकत्र भोजन केले. कार्यक्रम आयोजनासंबंधीचे आभारप्रदर्शन बंधु अरूण पालकृत यांनी केले. म. थि. फे. कोषाध्यक्ष बंधु भडभडे यांनी भारत समाज पूजेच्या व्याप्तीविषयी माहिती दिली. सेमिनारला एकूण ३६ जणांची उपस्थिती होती. असे कार्यक्रम वारंवार व्हावेत असा उपस्थितांनी मनोदय व्यक्त केला.

◆ **दी अकोला थिऑसॉफिकल लॉज, अकोला –**

१) 'अड्यार डे' निमित्त कार्यक्रम थोडा उशिराने म्हणजे दि. २३/०२/२०२० रोजी संपन्न झाला. बंधु सोनोने, बंधु कदम, बंधु नवथळे, भगिनी डॉ. माथने यांनी आपले विचार व्यक्त केले. अकोला लॉजच्या सदस्यांच्या क्रियाशीलतेचे ॲड. संजय पोटे यांनी कौतुक केले. लॉज व्यवस्थापन, अभ्यासवर्ग, युवावर्गाचा सहभाग इत्यादि संबंधी जवळ जवळ ३ तास उपयुक्त चर्चा झाली आणि यात सर्व सदस्यांनी सक्रीय भाग घेतला. बंधु पवार यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

२) अकोला लॉजतर्फे नुकताच राऊतवाडीतील ब्रम्हविद्या मंदिरात प्रतिभावंतांचा सत्कार सोहळा व नवीन सभासदांच्या प्रमाणपत्र वितरणाचा सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख वक्ते प्रा. यादव यांनी ''विद्यार्थ्यानो आव्हाने स्वीकारा'' असा सल्ला दिला. विद्यार्थ्यांना चिंदन, वाचन, मननातून व्यक्तिमत्व विकासाचा मार्ग मिळतो. त्यासाठी अभ्यासात सातत्य असले पाहिजे. काळाशी सुसंगत ज्ञान प्राप्त करून विद्यार्थ्यांनी आव्हानातून वाट घडवावी असे आव्हाहन प्रा. यादव यांनी केले. यावेळी लेखक एस्. के. कदम यांच्या ''इदं न मम'' या लेखसंग्रहास जीवनगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. सचिव रणजीत पवार यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. याशिवाय किर्तनकार डॉ. कल्याणी पदमने यांनी ''आध्यात्मिक विचारांची गरज असून यातूनच संस्कारशील

पिढी घडू शकते'' असे विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. अशोक सोनाने यांनी केले.

◆ **दी अकोट थिऑसॉफिकल लॉज, अकोट –**

अकोट स्थानिक थिऑसॉफिकल लॉज आणि टी.ओ.एस्. च्या वतीने २१ फेब्रुवारी २०२० रोजी 'अड्यार डे' चे औचित्य साधून एका गरजू जोडप्याला घरगुती भोजनालयाचा व्यवसाय सुरू करण्यासाठी गॅस सिलेंडर व शेगडी भेट देण्यात आली. तसेच अकोट लॉजच्या सचिव श्रीमती मिनाक्षीताई महाजन व ज्येष्ठ सदस्या श्रीमती नलिनीताई ढगेकर यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी म. थि. फे. चे अध्यक्ष ॲड. संजय पोटे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अकोट लॉजच्या उपाध्यक्षा श्रीमती शालिनीताई पोटे, सभासद भगिनी राखीताई पालखडे व भगिनी तृप्ती पालखडे आदींनी परिश्रम घेतले.

◆ **दी डोंबिवली थिऑसॉफिकल लॉज, डोंबिवली –**

डोंबिवली लॉजच्या वतीने दि. २३/०२/२०२० रोजी भालचंद्र दिनकर सभागृह, कल्याण (प.) येथे स. १० ते संध्या. ५ यावेळेत थिऑसॉफीवर सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते. सभासद व अन्य निमंत्रित मिळून २५ जण उपस्थित होते. राष्ट्रीय व्याख्याते व म. थि. फे. चे पूर्व अध्यक्ष बंधु नंदकुमार राऊत यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच बंधु श्रीपाद आगाशे यांनी 'दृष्टी दान' या विषयावर भाष्य केले.

◆ **दी मालेगाव लॉज, मालेगाव –**

**मालेगाव लॉज येथे दोन दिवसीय कार्यशाळा**

१) शनिवार ११ जानेवारी २०२० रोजी बंधु कौस्तुभ भडभडे आणि बंधु भा. द. तेंडूलकर यांनी मालेगाव लॉजला भेट दिली. मालेगाव लॉजचे डॉ. सत्यजित शाह यांच्या नवीन निवासस्थानी बंधु भडभडे यांनी भारत समाज पूजेचे पौरोहित्य केले. पूजेमध्ये सुमारे ३५ जण सहभागी झाले. यामध्ये लॉजच्या सभासदांखेरीज डॉ. शाह यांचे आणि इतर सभासदांचे कुटुंबीय सहभागी झाले. महिलांची उपस्थिती मोठ्या प्रमाणावर होती. पूजेच्या सुरवातीला बंधु भडभडे यांनी उपस्थितांना पूजेची पार्श्वभूमी, सविस्तर पद्धती आणि फलश्रुती याविषयी माहिती दिली आणि पूजेनंतर जिज्ञासूंच्या प्रश्नांना समपर्क उत्तरे दिली.

दुसऱ्या दिवशी रविवारी दि. १२ जानेवारी २०२० रोजी बंधु तेंडूलकर यांचे 'सत्यान्नास्ति परोधर्मः' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले. यावेळी लॉजचे सभासद व इतर काही अशी २५ वर उपस्थिती होती. सुमारे १ तास व्याख्यान

व नंतर अर्धा तास प्रश्नोत्तरे झाली. वैश्विक प्रार्थनेने समारोप झाला.

असे उपक्रम लॉज पातळीवर घडवून आणण्यासाठी म. थि. फे. ने पुढाकार घेतला याचे सर्व उपस्थितांनी मनःपूर्वक स्वागत केले आणि दर महिन्याला असे कार्यक्रम झाले तर लॉजमधील उपस्थिती वाढेल आणि थिऑसॉफीच्या प्रसाराला वेग येईल अशी भावना श्रोत्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमामध्ये बंधु बी. एम्. डोळे, सत्यजीत शाह आणि मालेगाव लॉजचे अध्यक्ष/सचिव यांनी उत्साहाने भाग घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

◆ **दी पूना लॉज, पुणे** –

१) **लॉज वर्धापन दिवस** – पूना लॉजची स्थापना २५ जानेवारी १८८२ रोजी झाली. २५/०१/२०२० या दिवशी लॉजला १३८ वर्षे झाली. त्यानिमित्त रविवार २६/०१/२०२० रोजी लॉजचा वर्धापनदिन साजरा करण्यात आला. मुख्यत्वे बंधु बुरसे यांनी लॉजचा सुरवातीचा इतिहास अतिशय सुंदरपणे सर्वांसमोर मांडला तर बंधु तेंडूलकर यांनी लॉजच्या संवर्धनात ज्या धुरिणांनी वेळोवेळी मोलाची भर घातली त्यांची माहिती सांगितली. याशिवाय बंधु अभ्यंकर यांनी लॉज व त्याच्या सदस्यांनी कोणकोणत्या गोष्टींशी अजिबात तडजोड करता कामा नये व लॉजने आपल्या कार्यपद्धतीत काटेकोरपणे काय दक्षता बाळगली पाहिजे याबद्दल आपले मत व्यक्त केले. इतर काही सदस्य २-३ मिनिटे बोलले. नंतर स्नेहभोजनाचे बंधु पालकृत यांनी आयोजन केले व त्याचा सर्वांनी आनंद घेतला.

२) **म. थि. फे. तर्फे पूना लॉजमध्ये खुल्या चर्चासत्राचे आयोजन** – थिऑसॉफीसंबंधीचे अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिलेले असतात आणि या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळण्यासाठी लॉजच्या नियमित कार्यक्रमांव्यतिरिक्त एखादे वेगळे चर्चासत्र घेण्यात यावे अशी अनेक सभासदांची मागणी असल्यामुळे एक प्रायोगिक सत्र दि पूना लॉज येथे शनिवार दि. २५ जानेवारी २०२० रोजी दुपारी ३ ते ५.३० यावेळेत आयोजित करण्यात आले होते. या सत्राची वर्तमानपत्रात प्रसिद्धी दिल्यामुळे सत्राला सभासद व बिगर-सभासद मंडळींची हजेरी लागली. बंधु बी. डी. तेंडूलकर व बंधु एस्. एच्. वैद्य यांनी अनुक्रमे ‘थिऑसॉफीतील ज्ञान’ व ‘थिऑसॉफीतील विज्ञान’ या विषयांसंबधित चर्चा केली. उपस्थितांनी त्यांना अनेक प्रश्न विचारून शंका समाधान केले. बंधु संजय पोटे यांनी या सत्राचे संचलन केले. प्रत्येक महिन्याच्या चवथ्या शनिवारी दुपारी असे खुले

चर्चासत्र घेण्यात यावे अशी सभासदांनी सूचना केली. या चर्चासत्रामध्क्षे ३२ जणांनी सहभाग घेतला.

३) **१७ फेब्रुवारी – अड्यार डे** – यादिवशी अ) लिऑर्डानो ब्रुनो (हौतात्म्य १६००), ब) सी. डब्ल्यु. लेडबीटर (जन्मदिन १८४७), क) कर्नल ऑलकॉट (मृत्युदिन १९०७), ड) जे कृष्णमूर्ती (मृत्यूदिन १९८६) यांचे स्मरण लॉजमध्ये केले जाते. त्याप्रमाणे कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बंधु रायरीकर होते. अनुक्रमे लिऑर्डानो ब्रुनो यांच्याबद्दल बंधु अभ्यंकर तर  सी. डब्ल्यु. लेडबीटर यांच्याबद्दल बंधु कालभांडे तर कर्नल ऑलकॉट यांच्याबद्दल बंधु बुरसे आणि जे कृष्णमूर्ती यांच्याबद्दल बंधु व्ही. डी. देशपांडे बोलले. अड्यार डे च्या निमित्ताने सदस्यांनी रू १७०० /– जमा केले व त्यात लॉजतर्फे रू ३०० /– भर घालण्यात आली आणि एकूण रू २००० /– अड्यार पाठवण्यात आले.

४) **म. थि. फे.** तर्फे **पूना लॉजमध्ये** दि. शनिवार २९/०२/२०२० रोजी दुपारी ३ ते ५.३० या वेळात **खुल्या चर्चासत्राचे दुसरे पुष्प** संपन्न झाले. या सत्रास १६ जण उपस्थित होते. पुर्नजन्म, मृत्यु व मृत्युनंतर, स्वप्ने, थिऑसॉफिकल गूढविद्या इत्यादि विषयांवरील प्रश्नांना चर्चासत्रातील मार्गदर्शक बंधु तेंडूलकर आणि बंधु एस्. एच्. वैद्य यांनी समर्पक उत्तरे दिली. सहभागी लोकांनी पण त्यांची मते मांडली. बंधु संजय पोटे यांनी सुत्रसंचालन केले. 'मृत्युनंतर' या विषयावर एकदिवसीय सेमिनार घ्यावे असे उपस्थितांनी सुचविले.

५) नेहमीप्रमाणे प्रत्येक रविवारी सकाळी ९.३० ला भारत समाज पूजा तर त्यानंतर एका धर्माची प्रार्थना व ओंकार उच्चारण झाले. त्यानंतर व्याधीनिवारण विधी झाला. तसेच प्रत्येक रविवारी सकाळी १०.३० ला व्याख्याने झाली. यात जानेवारी आणि फेब्रुवारी २०२० या काळात एका रविवारी इको–कन्व्हेंशन घेण्यात आले तसेच 'Thought Power - It's control and culture' या ॲनी बेझंट यांच्या पुस्तकाचे अध्ययन बंधु बुरसे यांनी घेतले. बंधु शरद वैद्य यांनी 'Theosophy Science Meet' घेतली. बंधु नितीन अभ्यंकर यांनी ''दामोदर व थिऑसॉफिकल चळवळ'' या विषयावरील व्याख्यानमालेतील सहावे सत्र घेतले आणि बंधु तेंडूलकर यांनी ''थिऑसाफीच्या लोगोचा अर्थ'' या विषयावर मार्गदर्शन केले.

६) दर मंगळवारी व शुक्रवारी बंधु शशांक बुरसे यांच्या मार्गदर्शनाखाली

दुपारी ४ ते ५ या वेळेत 'The Secret Doctrine' या ग्रंथाचे तर ५ ते ६ यावेळेत 'The Mahatma Letters' या ग्रंथाचे अध्ययन केले जाते.

७) रोज ४ ते ६ लॉजचे ग्रंथालय चालू असते. लॉजमध्ये थिऑसॉफीवरील मराठी व इंग्रजी पुस्तके विक्रीला उपलब्ध आहेत. या दोन्हीची जबाबदारी सध्या बंधु गांधी आणि भगिनी माया जाधव पहातात.

◆ **दी धंतोली लॉज, नागपूर** –

दि. ९ फेब्रुवारी २०२० रोजी धंतोली लॉज, नागपूर येथे झालेल्या साप्ताहिक कार्यक्रमात बंधु मधुकर वानखेडे – सचिव, अमरावती लॉज व भगिनी मिनाक्षी वानखेडे उपस्थित होते व त्यांनी सकाळी ७.३० वाजता भारत समाज पूजा केली. भगिनी सुनंदा बोंडे यांनी 'व्याधी निवारण विधी' घेतला तर बंधु ओंकार बोराडे यांनी ८ वाजता व्याख्यान दिले.

◆ **दी सांगली लॉज, पुणे** –

१७/११/२०१९ रोजी सांगली लॉजमध्ये थिऑसॉफिकल सोसायटीचा स्थापनादिवस साजरा करण्यात आला. १७ सदस्य या कार्यक्रमास उपस्थित होते. बंधु आर. सी. माळी अध्यक्षस्थानी होते तर बंधु प्रा. सी. एस्. मिरजकर आणि बंधु डी. एन्. कारखानीस यांनी ''**थिऑसॉफिकल सोसायटीची स्थापना कशी झाली? व या सोसायटीचे महत्व**'' यावर मार्गदर्शन केले. सचिवांनी सर्व उपस्थित सदस्यांचे आभार मानले. ★★★

## Ponder Over It

"Related to the population of the world you may be few in numbers, but spiritual strength and power depend not upon numbers. Rather do they depend upon burning sincerity."

"Be brave for Truth and Brotherhood and we shall be with you throughout the ages." - Masters

''जागतिक लोकसंख्या विचारात घेतल्यास तुम्ही अल्पसंख्य आहात, परंतु आत्मबल संख्येवर अवलंबून नसते, किंबहुना तुमची ज्वलंत प्रामाणिक तळमळ त्याच्या मुळाशी असते.''

''सत्य आणि बंधुभाव यांच्याकरिता शूरवीराचे जीवन जगा आणि युगानुयुगे आम्ही तुमची साथ देऊ.'' – मास्टर्स

# दी थिऑसॉफिकल सोसायटी

मुख्य कार्यालय : अड्यार (चेन्नई) ६०० ०२०.
e-mail : secy.hq@ts-adyar.org
website : www.ts-adyar.org

**आंतरराष्ट्रीय अध्यक्ष** : बंधु टीम बॉईड, अड्यार, चेन्नई.

## भारतीय शाखा

**कार्यालय** : थिऑसॉफिकल सोसायटी, कामाच्छा, वाराणसी - २२१ ०१०.
फोन : (०५४२) २४५०७७६, २४००७७३
e-mail : theosophyvns@gmail.co
website : www.theosophy-india.org

**महासचिव** : श्री. प्रदिप गोहील **कोषाध्यक्ष** : बंधु व्ही. नारायणन

## मराठी थिऑसॉफिकल फेडरेशनची कार्यकारिणी

**अध्यक्ष** : ॲड. संजय दि. पोटे
२, चिंतामणी अपार्टमेंटस्, प्लॉट नं ७२, उजवी भुसारी कॉलनी,
कोथरूड, पुणे ४११०३८. मोबाईल नं. : ७७४४९१०७८७

**उपाध्यक्ष** : बंधु प्रा. आर. सी. माळी
सांगली ४११००४. मो. नं. : ९९२२२३१७८८

**सचिव** : बंधु अरूण मा. पालकृत
इंद्रप्रस्थ, ए१/११, साई चौकाजवळ, न्यू सांगवी, पुणे ४११०६१.
फोन : ९४२२०३६७०२

**कोषाध्यक्ष** : बंधु कौस्तुभ भडभडे
पुणे ४११००४. मो. नं.: ९६२३४४८२४३

**उपसचिव** : भगिनी प्रवीणा शाह, खामगाव.

**कार्यकारिणी सदस्य** : बंधु जे. के. जाधव बेळगाव, बंधु डी. एस. कारखानीस सांगली, बंधु ए. पी. लोखंडे नागपूर, बंधु एस. के. विसाळ मालेगाव, भगिनी एस. एन. मेहेत्रे नागपूर, बंधु ॲड. एन. डी. राऊत अमरावती, बंधु डॉ. ए. एस. सोनोने अकोला, बंधु एन. एन. राऊत अकोला, बंधु प्रा. एन. डी. अभ्यंकर पुणे (आमंत्रित), बंधु प्रा. सी. ए. शिंदे अड्यार, चेन्नई (इंडियन कॉन्सिल रिप्रेझेंटेटिव्ह.)

**विश्वबंधुत्व संपादक मंडळ** : बंधु नितीन अभ्यंकर, बंधु शशांक बुरसे, बंधु ए. एस. सोनोने, भगिनी नीला अभ्यंकर.

**फेडरेशन कार्यालय : मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

द्वारा : पूना लॉज, ९१८ शिवाजीनगर, गणेशवाडी, बी.एम्.सी.सी.रोड, पुणे ४११ ००४.
फोन : ०२०-२५६७०४१८

# थिऑसॉफिकल सोसायटी

## तीन उद्दिष्टे

१. जात, धर्म, लिंग व वर्ण हे भेद न करता मानवजातीच्या विश्वबंधुत्वाचे जिवंत केंद्र बनविणे.

२. तौलनिक धर्म, तत्वज्ञान, विज्ञान यांच्या अध्ययनास उत्तेजन देणे.

३. अनाकलनीय सृष्टिनियम व मानवातील सुप्त शक्तींचे संशोधन करणे.

## तीन महान सत्ये

१. माणसाचा आत्मा अमर आहे, त्याच्या विकासाला आणि वैभवाला सीमा नाही.

२. जे तत्व जीवन देते, ते आपल्या आत तसेच बाहेरही वास करते. ते अमर व सदा कल्याणकारी आहे. ते ना ऐकू येते, ना दिसते, ना हुंगता येते; पण ते जाणण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या मनुष्याला अनुभवगम्य आहे.

३. प्रत्येक माणूस स्वत:च स्वत:चा एकमेव शास्ता आहे. स्वत:ला प्रकाशात किंवा अंध:कारात ठेवणारा तोच, जीवन, पुरस्कार, शिक्षा हे त्याचे हुकुम.

## विचार स्वातंत्र्य

थिऑसॉफिकल सोसायटी जगात दूरदूर फोफावली आहे. सर्व धर्मांचे अनुयायी, आपआपले धार्मिक सिद्धांत, शिकवण व श्रद्धा यांचा त्याग न करता सोसायटीचे सभासद झाले आहे व होत आहेत. म्हणून आता हितावह (desirable) हे आहे की सर्वांना हे पक्के माहित असायला हवे की असे कोणतेही सत्य वा सिद्धांत किंवा मत नाही, मग ते कोणीही सांगितलेले अथवा शिकवलेले असो; जे सोसायटीच्या कोणत्याही सभासदावर बंधनकारक असू शकेल. सोसायटीच्या सभासदाने ते मान्य करावे किंवा नाही याचे त्याला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणाही टीचरला किंवा लेखकाला एच्. पी. ब्लॅव्हॅटस्की बाईंपासून ते आजपर्यंत आपले मत व उपदेश, शिकवण सभासदावर लादण्याचा अधिकार नाही. कोणत्याही विचार प्रवाहाबरोबर जाण्याचा, विचार-पंथाचा स्वीकार करण्याचा हक्क त्याला आहे, पण त्याचबरोबर आपली पसंती इतरांवर त्याला लादता येणार नाही. सभासदाचा त्याच्या वैयक्तिक मतामुळे मतदानाचा हक्क आणि निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून उभे राहण्याचा हक्क काढून घेता येणार नाही. मते अथवा श्रद्धा यांमुळे काही विशेष अधिकार मिळणार नाही किंवा शिक्षाही होणार नाही. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सर्व सभासदांना जनरल कौन्सिलची कळकळीची विनंती आहे की, त्यांनी सोसायटीच्या या मूलभूत तत्वांचा आदर करून त्यांना अबाधित राखावे, त्यांचे संरक्षण करावे व त्याबरहुकुम आचरण करावे, सौजन्य बाळगून व इतरांची कदर करून निर्भयपणे मतप्रदर्शन व प्रगटीकरणाचा हक्क गाजवावा.

**संपर्क : 'विश्वबंधुत्व' – मराठी थिऑसॉफिकल फेडरेशन**

९१८, शिवाजीनगर, गणेशवाडी, डेक्कन जिमखाना, पुणे ४११ ००४.

दूरध्वनी:(०२०) ५६७०४१८

**Periodical Vishva Bandhutva**

**Reg. No. MAHMAR / 2003 / 7740**

## Printed Books

To,

From :

**Secretary,**
Marathi Theosophical Federation
C/O - The Poona Lodge, Theosophical Society
918, Shivajinagar, Ganeshwadi,
Deccan Gymkhana, Pune 411004.